रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, जानेवारी १८, २००७/पौष २८, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.**—फेब्रुवारी २००७ मध्ये ज्यांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत अशा महानगरपालिकांनी विशेष अर्थसंकल्प तयार करण्याची तरतूद करण्याकरिता अध्यादेश . . | **पृष्ठे** **५-८** |

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जानेवारी २००७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. I OF 2007.**

AN ORDINANCE TO MAKE PROVISIONS FOR PREPARATION OF SPECIAL BUDGET BY THE MUNICIPAL CORPORATIONS, THE GENERAL ELECTIONS OF WHICH ARE TO BE HELD IN FEBRUARY 2007.

### सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.

**फेब्रुवारी २००७ मध्ये ज्यांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत अशा महानगरपालिकांनी विशेष अर्थसंकल्प तयार करण्याची तरतूद करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका १ फेब्रुवारी २००७ रोजी घेण्यात येणार आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका घेण्याची सुनिश्चिती करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाद्वारे एक आदर्श आचार संहिता विहित करण्यात आली आहे ;



[**किंमत :** रुपये ९-००]

**आणि ज्याअर्थी,** विहित आचार संहितेस अनुसरून उपरोक्त महानगरपालिकांच्या निवडणुका मुक्त व निःपक्ष वातावरणात होण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने आणि सार्वत्रिक निवडणुकीनंतर अधिकारावर येणाऱ्या नव्याने निवडून आलेल्या निकायास संबंधित महानगरपालिकेचा अर्थसंकल्प तयार करण्याची संधी देण्याच्या दृष्टीने, सन २००६-२००७ साठीच्या वाढीव अंदाजास मंजुरी देण्यासाठी आणि उक्त महानगरपालिकांपैकी प्रत्येक महानगरपालिकेने दिनांक १ एप्रिल २००७ रोजी प्रारंभ होणाऱ्या व दिनांक ३१ जुलै २००७ रोजी किंवा सार्वत्रिक निवडणुकीनंतर उक्त महानगरपालिकांकडून ज्या अगोदरच्या दिनांकास नियमित अर्थसंकल्प तयार करण्यात येईल त्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत अंमलात राहील असा विशेष अर्थसंकल्प तयार करावा यासाठी, तात्पुरता कायदा करून विशेष तरतुदी करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांकरिता, तात्पुरता कायदा करून, विशेष तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व प्रयुक्ती.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका (तात्पुरत्या तरतुदी) अध्यादेश, २००७ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

(३) तो, दिनांक १ फेब्रुवारी २००७ रोजी ज्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत अशा महानगरपालिकांना लागू असेल.

व्याख्या.

**२.** या अध्यादेशामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " संबद्ध महानगरपालिका कायदा " म्हणजे,—

(एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई महानगरपालिका अधिनियम ; १८८८ चा मुंबई ३.

(दोन) नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ ; १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(तीन) इतर कोणत्याही महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ ; १९४९ चा मुंबई ५९.

(ब) या अध्यादेशात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या त्या संबद्ध महानगरपालिका कायद्यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

महानगरपालिका आणि परिवहन उपक्रम यांचा अर्थसंकल्प.

**३.** (१) संबद्ध महानगरपालिका कायद्यामध्ये व त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,——

(अ) महानगरपालिकेच्या बाबतीत, आयुक्त ;

(ब) बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या बाबतीत, महाव्यवस्थापक ; आणि

(क) इतर कोणत्याही परिवहन उपक्रमांच्या बाबतीत, परिवहन व्यवस्थापक,

त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अर्थसंकल्पाच्या बाबतीत, २००६-०७ या शासकीय वर्षाच्या किंवा यथास्थिति, वित्तीय वर्षाच्या सरासरी मासिक उत्पन्न व खर्च यांच्या चार पटीएवढे अंदाजित उत्पन्न व खर्च यांचे विवरणपत्र तयार करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या विवरणपत्राचा अन्वयार्थ २००७-०८ या वित्तीय वर्षाच्या किंवा यथास्थिति, २००७-०८ या शासकीय वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांचा अर्थसंकल्प म्हणून लावण्यात येईल, आणि तो ३१ जुलै २००७ पर्यंत किंवा १ फेब्रुवारी २००७ रोजी घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकानंतर रचना करण्यात आलेल्या संबंधित महानगरपालिकेकडून नियमित अर्थसंकल्प ज्या अगोदरच्या तारखेस अंतिमरित्या निश्चित करण्यात येईल अशा तारखेपर्यंत अंमलात राहील.

संबद्ध महानगरपालिका कायदा आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेले किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम लागू करणे.

**४.** या अध्यादेशाद्वारे अन्यथा तरतुद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, संबद्ध महानगरपालिका कायद्यामध्ये व त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये असलेल्या, अर्थसंकल्प तयार करण्यासंबंधातील तरतुदी, या अध्यादेशाद्वारे करण्यात आलेल्या तरतुदींशी, त्या जेथवर विसंगत नसतील तेथवर योग्य त्या फेरफारांसह, अर्थसंकल्प तयार करण्याच्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात लागू होतील.

आयुक्ताचे विशेष तात्पुरते अधिकार.

**५.** संबद्ध महानगरपालिका कायदा किंवा त्यात अंतर्भूत असलेले किंवा त्याखाली केलेले नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) अधिकारी व कर्मचारी यांची पदनामे व श्रेणी आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला द्यावयाचे वेतन, फी व भत्ते यांची रक्कम व स्वरूप नमूद करणारी, आयुक्ताकडून तयार करण्यात आलेली अनुसूची ही स्थायी समितीकडून किंवा, यथास्थिति, शिक्षण समितीकडून मंजूर करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ; आणि

(ब) आयुक्तास, सन २००६-०७ या शासकीय वर्षात उद्‌भवणाऱ्या कोणत्याही खास किंवा अनपेक्षित गरजा पूर्ण करण्याच्या प्रयोजनार्थ, या वर्षातील कोणत्याही अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम वाढविता येईल किंवा अतिरिक्त अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करता येईल ;

(क) कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, सन २००७-०८ या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्ये करणे आवश्यक असलेल्या खर्चाचे स्वरूप लक्षात घेऊन त्यास इष्ट वाटेल, अशी पुरेशी तरतूद करता येईल.

अडचण दूर करणे.

**६.** या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध महानगरपालिका कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याच्या किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासन, प्रसंगानुरुप आदेशाद्वारे अडचण दूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटेल तर, ह्या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध महानगरपालिका कायद्याच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करू शकेल.

## निवेदन.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांच्या तरतुदींद्वारे, ज्या विविध महानगरपालिका प्राधिकाऱ्यांकडे, उक्त अधिनियमांच्या तरतुदी पार पाडण्याचे काम सोपवण्यात आलेले आहे, त्यांना, यथास्थिति, आगामी वित्तीय वर्षासाठी किंवा शासकीय वर्षासाठी, उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करणे अत्यावश्यक करण्यात आलेले आहे. १ फेब्रुवारी २००७ रोजी दहा महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत, त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेशांचे पालन करण्याच्या दृष्टीने आगामी सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता, उक्त महानगरपालिकांच्या २००७-०८ या संपूर्ण शासकीय किंवा वित्तीय वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज मावळत्या निकायांनी सादर करू नयेत व त्यांनी ते तयार करू नयेत आणि त्यास मंजुरी देऊ नये आणि उक्त महानगरपालिकांचे २००७-०८ या शासकीय किंवा वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्प, सार्वत्रिक निवडणुकीनंतर अधिकारावर येणाऱ्या नव्याने निवडून आलेल्या निकायानी तयार करावेत व सादर करावेत व त्यांनी त्यास मंजुरी द्यावी, असे वाटते, म्हणून, आयुक्तास, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या महाव्यवस्थापकास आणि १ फेब्रुवारी २००७ रोजी ज्यांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत अशा विविध महानगरपालिकांच्या, परिवहन उपक्रमांच्या परिवहन व्यवस्थापकांना २००६-०७ या शासकीय किंवा वित्तीय वर्षाकरिता सरासरी मासिक उत्पन्न व खर्च यांच्या चार पटीएवढे अंदाजित उत्पन्न व खर्च यांचे विवरणपत्र तयार करण्याचे व स्वीकृत करण्याचे अधिकार प्रदान करणे इष्ट ठरेल असे वाटते. तसेच अशा, विवरणपत्राचा अन्वयार्थ २००७-०८ या वित्तीय वर्षाच्या किंवा यथास्थिति, शासकीय वर्षाच्या या महानगरपालिकांचा पहिल्या चार महिन्यांचा अर्थसंकल्प म्हणून लावण्यात येईल आणि तो ३१ जुलै २००७ पर्यंत किंवा १ फेब्रुवारी २००७ रोजी घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्यानंतर रचना करण्यात आलेल्या महानगरपालिकेकडून नियमित अर्थसंकल्पास ज्या अगोदरच्या तारखेस अंतिम स्वरूप देण्यात येईल, त्या तारखेपर्यंत अंमलात राहील, अशी तरतूद करणे देखील आवश्यक वाटते. म्हणून, उक्त प्रयोजनासाठी याबाबत तात्पुरता कायदा करून विशेष तरतुदी करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, तात्पुरत्या स्वरूपाचा कायदा करून विशेष तरतुदी करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली असल्याने हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १८ जानेवारी २००७.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. ज. मो. फाटक,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई